BDC LIBRARY
New Paper Clipping
A.Y. 2023-2024

# श्रमसंस्कार शिबिरातून श्रमाचे संस्कार घडतात : प्रा. चौगले

**पाटण : पुढारी वृत्तसेवा**

श्रमसंस्कार शिबिरे काळाची गरज असून, अशा शिबिरातून समाज प्रबोधन करणारे व समाज उपयोगी नवीन उपक्रम विद्यार्थ्यांनी राबवले पाहिजेत. तसेच श्रमसंस्कार शिबिरातून श्रमाचे संस्कार घडत असतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे एन.एस.एस. संचालक डॉ. टी.एम.चौगले यांनी केले.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस.डी.पवार, पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे, नॅकच्या समन्वयक डॉ. हेमलता काटे,डॉ. जी.एस पट्टेबहादुर, डॉ.भरत जाधव, प्रा. बळीराम लोहार, सरपंच रुपाली सलते, उपसरपंच अमोल देसाई उपस्थित होते.

संजीव चव्हाण म्हणाले, श्रमसंस्कार शिबिर आयुष्य घडवित असते. राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याची ओळख करून देणे होय. प्राचार्य डॉ. एस.डी. पवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जी.एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक यांनी केले. आभार डॉ. भरत जाधव यांनी मानले. सूत्रसंचालन विद्यार्थिनी काजल साळुंखे हिने केले.

कार्यक्रमास प्रा.बळीराम लोहार, प्रा. दिनेश रेवडे, प्रा.गणेश गायकवाड, प्रा. ए. ए. सूर्यवंशी, प्रा. टी. आय. पाटणकर, प्रा. व्ही.आर. शिर्के प्रा. एस. जी. फुटाणे, प्रा. व्ही. एस. कांबळे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के शिर्के, यांच्यासह मौजे सलतेवाडी गावचे पोलिस पाटील उपस्थित होते.